MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

## दहावे अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य संमेलन नागपुरात होणार

सोलापूर (म.मुस्लिम कबीर)

अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषद, सोलापूर तर्फे आयोजित दहावे आखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य संमेलन १९ आणि २० एप्रिल २०२५ ला नागपूर येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती केंद्रीय अध्यक्ष डॉ अजीज नदाफ , सचिव अय्यूब नल्लामंदू व संयोजक तथा ज्येष्ठ साहित्यिक प्रा .जावेद पाशा कुरेशी यांनी एका पत्रकाद्वारे जाहिर केले आहे .संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवड , स्मरणिका प्रकाशन व इतर कामे व जबाबदाऱ्या निश्चित करण्यासाठी लवकरच एक मिटींग घेण्याचे ठरले आहे . हे संमेलन अखिल भारतीय स्तरावर संपन्न व्हावे, यासाठी अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषद यांच्या मुख्य आयोजकां सह भारतीय मुस्लीम परिषद, फुले शाहू आंबेडकर विचार मंच, छवी पब्लिकेशन्स, हिंदी साहित्य परिषद या सर्वांच्या सहकार्य घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे .हे संमेलन व्यवस्थित पार पाडवे म्हणून नियोजन करण्यासाठी अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य परिषद सर्व साहित्यिकांशी संपर्क साधत आहे , या अगोदर प्रा . जावेद पाशा कुरेशी यांच्या मार्गदर्शनाखाली दुसरे साहित्य संमेलन मा . अजीज नदाफ सरंच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे १९९२ साली संपन्न झाले होते आता नागपुरला पुन्हा दहावे साहित्य संमेलन आयोजित करण्याचा मान मिळाला आहे .कृपया या संमेलनासाठी नांव नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क साधावे. मुख्यसंयोजक ,प्रा.जावेद पाशा कुरेशी, नागपूर - ८४५९५६३४८९ / ९४२२१५४२२३ डॉ .इ जा .तांबोळी ,उपाध्यक्ष . ९८९०९१९११८ अय्यूब अ .लतीफ नल्लामंदू सचिव ९७६६८१९९८१ हसीब नदाफ खजीनदार ९३२६६२६४०८८


बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१५८ | शनिवार दि.२२ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -158 | SATURDAY DT.22 FEBRUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# बीड नगरपरिषदेच्या २०० कोटीच्या घोटाळ्यात गणेश पगारेचा हात पदोन्नतीसाठी जिल्हाधिकारी अविनाश पाठक व सिओ निता अंधारेची साथ तक्रारीचा अहवाल दाबला का?

गणेश पगारे च्या तक्रारीचा ढिगारा असताना सिओ निता अंधारे पदोन्नती ची शिफारस का करतात?
जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी मागवला गणेश पगारेच्या तक्रारीचा अहवाल निंता अंधारे यांनी देण्यास केली टाळाटाळ.
तक्रारदाराला गणेश पगारेच्या तक्रारीवर समितीमधील अधिकारी कर्मचाऱ्यांनी चौकशीचा अहवाल देण्यास टाळाटाळ.
जिल्हाधिकारी पाठक मुख्यधीकारी निताअंधारे धर्म संकटात भ्रष्टाचाराच्या चौकशीच्या अडून प्रमोशनचे षडयंत्र.
गणेश पगारे च्या विरोधात तक्रारी असताना पदोन्नतीसाठी मुख्याधिकारी निता अंधारे यांनी मंत्रालयात लावली फिल्डिंग.!
बीड नगरपरिषदेमध्ये २०० कोटीच्या घोटाळ्यात सहायक अकाउंटंट गणेश पगारेचा हात पदोन्नतीसाठी निता अंधारेची साथ.
गणेश पगारे नगर परिषदेच्या २०० कोटीच्या भ्रष्टाचारामध्ये बरबटलेला अनेक तक्रारी प्रकरणांमध्ये चौकशी चालू असताना पदोन्नती कशी देता निता अंधारेनी उत्तर दिले पाहिजे.
गणेश पगारे च्या विरोधामध्ये तक्रार असताना त्याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना पाठवलेला नाही जिल्हाधिकाऱ्यांनी पत्र व्यवहार करून सुद्धा मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी संबंधित प्रकरणाचा अहवाल दिलाच नाही.
मुख्याधिकारी निंता अधारेच्या भ्रष्टाचाराचा महामेरू गणेश पगारेला प्रमोशनचे डोहाळे.!









बीड ।प्रतिनिधी

बीड नगर परिषदेमध्ये २०० कोटी पेक्षा जास्त भ्रष्टाचार नगर परिषदेच्या मुख्याधिकारी निता अंधारे सहाय्यक अकाउंटंट गणेश पगारे यांनी बीड नगरपरिषद एखाद्या चित्रपटातला जीवन अशा पद्धतीने लुटण्यात आलेली आहे निंता अंधारे यांनी गणेश पगारेची अवैधरित्या पदोन्नतीसाठी शिफारस केलेला अहवाल ही पाठवण्यात आल्याची चर्चा सध्या नागरिकांमध्ये व बीडमध्ये नगर परिषदेतील कर्मचाऱ्यां कडून ऐकायला मिळत आहे. यामध्ये मात्र अकाउंटंट गणेश पगारे हा भ्रष्टाचाराने बरबटलेला असताना गणेश पगारेच्या कोट्यावधी रुपयांच्या भ्रष्टाचाराच्या तक्रारी व बीड नगर परिषदेमध्ये वादग्रस्त ठरलेला सहाय्यक अकाउंटंट 'क' दर्जाचा कर्मचारी असताना त्याला बीड नगर परिषदेच्या तिजोरीच्या चाव्या देण्यामध्ये सीओ निता अंधारे व आमदार सुरेश धस आमदार सदिप क्षिरसागर यांचा मोठा हात आहे. अकाउंटट गणेश पगारे ला वाचविण्यासाठी व गणेश पगारेच्या पदोन्नतीसाठी मुख्याधिकारी नीता अंधारे व काही बीड नगर परिषदेतील चौकशी समितीतील अधिकारी कर्मचारी ही पाठराखण करत आहेत. भ्रष्टाचारी ठपक्का बीड नगरपरिषदेचा वादग्रस्त अधिकारी कर्मचारी अकाउंटंट गणेश पगारे यांच्या चौकशी व तक्रारीचा ढिगारा चौकशी मध्ये दोषी असताना मात्र चौकशी अहवाल शासनाला न पाठिवताच त्याच्या पदोन्नतीचा अहवाल मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी पाठविल्याची चर्चा सध्या बीड नगर परिषदेमध्ये जोर धरू लागली आहे बीड नगर परिषदेमधील कर्मचारी अधिकाऱ्यांमध्ये गणेश पगारेच्या विरोधात रोष असताना नीता अंधारे त्याला वाचून स्वतःची आर्थिक पोळी भाजून घेत असल्यामुळे नीता अंधारे यांना मात्र आता सरळ घरचा रस्ता दाखविण्याची गरज आहे. त्यामुळे राज्याचे उपमुख्यमंत्री व बीडचे पालकमंत्री अजित पवार यांची काही नागरिक भेट घेणार असल्याची ही चर्चा बोलली जात आहे गणेश पगारेच्या तक्रारीचा ढिगारा असताना पालकमंत्री अजित पवार यांना एक शिष्ट मंडळ भेटणार आहे आणि या शिष्ट मंडळाकडून व तक्रारदाराकडून गणेश पगारे व नीता अंधारे यांच्या २०० कोटीच्या भ्रष्टाचाराची चौकशीची मागणी होणार आहे त्यामुळे मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी गणेश पगारेच्या विरोधी तक्रारीचा अहवाल तक्रारदार व शासनाला न देता दडवून ठेवला आहे. व गणेश पगारेच्या पदोन्नतीसाठी निता अंधारे यांनी मात्र मंत्रालयात फिल्डिंग लावण्याची चर्चा सध्या जोर धरू लागली आहे.

जिल्हाधिकारी बीड यांना नगर विकास मंत्रालय कक्ष अधिकारी विशाल कांबळे महाराष्ट्र शासन यांनी दोशी लेखापाल गणेश पगारे विरोधात तक्रारीचा अहवाल मागविला होता परंतु हा अहवाल देण्यात आलेला नाही नीता अंधार यांनी हा अहवाल दाबून ठेवल्या असल्यामुळे त्यांना अनेक वेळा नगर विकास मंत्रालय मुंबई या ठिकाणाहून गणेश पगारीच्या तक्रारी संदर्भात अहवाल बाजूला आहे परंतु नीता अंधारे यांनी तक्रार अहवाल दिलेला नाही. नीता अंधारे व तक्रार अहवाल समितीतील अधिकारी कर्मचारी हे गणेश पगारेला वाचून त्याला पदोन्नती देण्यासाठी प्रयत्न करत आहेत परंतु व मुंबई मंत्रालय येथून कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन नगर विकास मंत्रालय यांनी केंद्रीय अन्वेषण ब्युरो नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक. छे. ३०/१(हिशळझह)२०२४/ञि(३०७०)/५०७१, दि. १-१०-२०२४ वरील संदर्भातील पत्राची प्रत व तो अर्ज मुख्याधिकारी नगरपरिषद बीड नीता अंधारे यांना पाठविला आहे सदर प्रकरणाची तपासणी करून नियमचित कारवाई करण्यासाठी केलेल्या कारवाईचा अहवाल शासनात पाठविणे बंधनकारक असताना निता अंधारे व आमदारा सुरेश धस आमदार संदीप क्षीरसागरा नी गणेश पगारेला अकाउंटंट पदाचा चार्ज दिला आहे तर बीडच्या नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे या स्वतःलाही वाचविण्यासाठी दोनशे कोटीच्या भ्रष्टाचारात गणेश पगारे सह स्वतः पण वाचण्यासाठी व केलेल्या भ्रष्टाचारामध्ये नीता अंधारे गणेश पगारे सह अनेक जण अडकतात त्यामुळे गणेश पगारेला वाचविण्याचा प्रयत्न त्यांनी नगरपरिषद व चौकशी समितीला अधिकारी कर्मचारी यांच्याकडून होत आहे. गणेश पगारेने बीड नगर परिषदेमध्ये २०० कोटीचा भ्रष्टाचारांमध्ये हातभार लावल्यामुळे प्रामुख्याने पाहिले तर गणेश पगारे हा बर बटलेला अधिकारी कर्मचारी आहे गणेश पगारे हा सर्व बीड नगर नगरपरिषदेचे आर्थिक व्यवहार पाहतो तर मुख्याधिकारी नीता अंधारे या असल्यामुळे गणेश पगारे व मुख्याधिकारी नीता अंधारे एक हाती सत्ताही स्वतःच्या घरीच बसून बीड नगर परिषद चालवत आहेत घरी बसून नगरपरिषद चालवाण्यामध्ये मुख्याधिकारी नीता अंधारे गणेश पगारे यांचा आता एक खूप मोठा भ्रष्टाचार बाहेर पडणार आहे. त्यामुळे गणेश पगारेची बदली करण्यापेक्षा निलंबनाची कारवाई करावी व पदोन्नती देण्यात येऊ नये तसेच गणेश पगारेच्या बाबतीमध्ये मुखधिकारी नीता अंधारे यांनी पॉझिटिव्ह रिपोर्ट पाठवून पदोन्नतीसाठी शिफारसी केलेली असल्याची सूत्रांकडून माहिती मिळालेली आहे

संभाव्य पदोन्नती विचार क्षेत्रातील महाराष्ट्र नगरपरिषद लेखा परीक्षक व लेखात सेवा संवर्ग कर्मचारी यांची पदोन्नती समितीच्या बैठकी करिता आवश्यक कागदपत्राच्या विविध वितरण पात्राची माहिती संबंधित पोर्टलमार्फत सादर करण्याबाबत एक पत्र त्रिंबक कांबळे जिल्हा सह आयुक्त नगरपरिषद प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांनी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी निता अंधारे यांना लिहिलेल आहे. बीड नगर परिषदेचे मुख्याधिकारी नगरपरिषद यांनी त्यांच्या कार्यालयातील गणेश तुळशीराम पगारे लेखापाल व लेखा निरीक्षक सेवा संवर्ग श्रेणी यांचा पदर त्यांनी तिचा छायांकित प्रस्ताव पदोन्नतीसाठी सादर केला होता याच संदर्भाने गणेश तुळशीराम पगारे च्या सुधारित पदोन्नतीची विचार क्षेत्राची आणि सुधारित यादी ती क्रमांक ८ व सेवा जेष्ठता क्रमांक. ९आणि याचे पदोन्नती समितीच्या बैठकीमध्ये लागणारे आवश्यक कागदपत्रे मागविलेले आहेत सदर प्रस्ताव उत्पादन समितीच्या बैठकीला लागणारे आवश्यक कागदपत्रे प्रस्ताव सोबत जोडण्यात आलेले आहेत पद्धतीने साठी आवश्यक असणारे सर्व कागदपत्राची पातळणी करूनच पदोन्नती दिली जाते व संबंधित माहिती ही अचूक असली पाहिजे भ्रष्टाचारांनी बरबटलेल्या गणेश पगारेला मुख्याधिकारी निता अंधारे या चांगला कर्मचारी म्हणून एक शिफारस पत्र देऊन बीडला मागून घेतले होते कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचीनी त्यांनी केला होता नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी नीता अंधारेना अकाउंटंट गणेश पगारेला पदोन्नती देऊन पुन्हा एकदा नगरपरिषद लुटण्याचा डाव आखण्याची योजना बीड नगरपरिषद मध्ये चालू आहे. तर जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे केंद्रीय अन्वेषण नवी दिल्ली यांचे संदर्भातील पत्राची पत्रासह यासोबत पाठविण्यात येत आहे असेही एक पत्र आलेले आहे सदर प्रकरणी तपास करून नियमित कारवाई करण्यासाठी अहवाल शासनात पाठविण्यात यावा असे एक पत्र विशाल कांबळे कक्ष निरीक्षक महाराष्ट्र शासन नगर विकास मंत्रालय मुंबई यांनी १२.२.२०२५ रोजी जिल्हाधिकारी यांना लिहिलेले आहे परंतु मुखधिकारी निता अंधारे व जिल्हाधिकारी या मात्र याकडे काना डोळा करत आहेत त्या गणेश पगारेला पाठीशी घालण्याचा पाप यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक व मुखधिकारी नीता अंधारे करत आहेत माननीय सेक्रेटरी मुख्य कार्यालय नवी दिल्ली भारत सरकार केंद्रीय अन्वेषण ब्युरो नवी दिल्ली भारत सरकार यांना बीड नगर परिषदेचे अकाउंटंट चा चार्ज असलेल्या गणेश पगारेने ३८ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची एक तक्रार चालू आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने बीड नगर परिषदेमध्ये कर वसुली विभागात मोठा भ्रष्टाचार झालेला बीड नगरपरिषद ही कशा पद्धतीने गणेश पगार यांनी चोरून खाल्ली आहे व भ्रष्टाचार हा कशाप्रकारे गणेश पगारेची केलाय याचं चित्र स्पष्ट असताना मुख्याधिकारी नीता अंधारे या गणेश पगारेला पाठीशी घालण्याच काम मुख्याधिकारी नीता अंधारे व जिल्हाधिकारी करत आहेत अशी चर्चा नागरिकांमध्ये होत आहे. गणेश पगारे लेखा पाल सहाय्यक याची जिल्ह्याबाहेर तात्काळ बदली साठी तक्रार बीड शहरातील कर वसुलीमध्ये कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार गणेश पगारे वादग्रस्त असताना मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी स्वतः शिफारस पत्र देऊन दोन आमदारांच्या मदतीने गणेश पगारेला बीडला घेतले विशेष लेखापरीक्षणात अहवाल हा दोषी आढळल्यामुळे नीता अंधारे व जिल्हाधिकारी पाठक हे शासनाला गणेश पगारेच्या तक्रारीतील अहवाल का पाठवत नाहीत ? अकाउंटट गणेश पगारे वरती तक्रारीचा ढिगारा असताना गणेश पगारेला नीता अंधारे व अविनाश पाठक हे वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत.

# महाराष्ट्राच्या प्रशासनाला विश्वासार्ह चेहरा

## देण्याचे काम महसूलचे - अपर मुख्य सचिव राजेश कुमार
## महसूलच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचा नांदेडमध्ये थाटात प्रारंभ
## माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी केले ध्वजारोहण

नांदेड ।प्रतिनिधी

कोणत्याही राज्याची, जिल्ह्याची ओळख तिथल्या महसूल प्रशासनाच्या कारभारावरून ठरते. राज्याचे प्रशासन कसे आहे हे महसूल कर्मचाऱ्यांच्या परिश्रम, वृत्ती व सचोटीवर ठरते. महसूल कर्मचाऱ्यांच्या सकारात्मक वृत्तीमुळे व दर्जेदार कामांमुळे देशात महाराष्ट्राची ओळख निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन राज्याच्या महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार यांनी आज येथे केले. महसूल विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे शानदार राजवैभवी उद्घाटन नांदेडमध्ये करण्यात आले. ध्वजारोहण माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी केले.

महसूलच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा २१ ते २३ फेब्रुवारी नांदेडमध्ये संपन्न होत आहेत. आज श्री. गुरूगोविंद सिंघजी स्टेडियम येथे शुभारंभ झाला. यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार प्रा. रविंद्र चव्हाण, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार जितेश अंतापूरकर, आमदार आनंद तिडके, आमदार श्रीजया चव्हाण, अपर मुख्य सचिव राजेशकुमार, विभागीय आयुक्त डॉ. दिलीप गावडे,निवृत्त जिल्हाधिकारी अरुण डोंगरे, जीएसटीचे सहआयुक्त अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जालना जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ, हिंगोली जिल्हाधिकारी अभिनव गोयल, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, मनपा आयुक्त डॉ. महेश डोईफोडे, अपर आयुक्त महसूल नैना बोंदार्डे, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, अपर आयुक्त प्रदिप कुलकर्णी, नितीन महाजन, सहायक जिल्हाधिकारी अनुष्का शर्मा, मेघना कावली, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर आदींची उपस्थिती होती.

आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये बोलतांना राजेशकुमार यांनी बारा वर्षानंतर या स्पर्धांचे आयोजन होत असल्याचा आनंद व्यक्त केला. या स्पर्धांचे नियोजन करणारे विभागीय आयुक्त दिलीप गावडे, नांदेडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, यांनी दर्जेदार स्पर्धा आयोजित केल्याबद्दल त्यांनी कौतूक केले. नांदेडमध्ये असणाऱ्या क्रीडा विषयक पायाभूत सुविधा, निवासाची व्यवस्था यामुळे याठिकाणी केवळ महसूलच्याच नव्हे तर अंतरराष्ट्रीय स्तरावरच्या स्पर्धा आयोजित केल्या जाऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

महसूल विभाग हा राज्याच्या प्रशासनाचा कणा असतो. यामुळे या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी दर्जेदारच असतात मात्र फायलींमध्ये प्रशासनाचे कसब दाखवणारे आता मैदानावर आपले प्राविण्य दाखविणार असल्याचा आनंद आहे. अगदी शिपाई पासून तर अप्पर मुख्य सचिवांपर्यंत आम्ही सगळे मैदानावर एक होऊन खेळतो. ही आमची एकजूट महसूलला वेगळी बळकटी देत असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण यांनी उद्घाटनपर भाषण करतांना महाराष्ट्राच्या महसूल विभागाच्या सर्व क्षेत्रातील वाटचालीबद्दल गौरवउद्गार काढले. त्यांनी कर्मचाऱ्यांवरील ताण तणाव हलका करण्यामध्ये क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा उपयोगी पडत असल्याचे सांगितले. या स्पर्धांना निधी कमी पडणार नाही, अशी तरतूद करण्याची सूचना केली. तत्पूर्वी त्यांनी ध्वजारोहण केले. तसेच खेळाडुंना शिस्त व सांघिक भावनेची शपथ दिली.

याप्रसंगी खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार रविंद्र चव्हाण, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार जितेश अंतापूरकर, आमदार आनंद तिडके, आमदार बालाजी कल्याणकर यांनी शुभेच्छापर संबोधन केले. यावेळी महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण नरमवार, महाराष्ट्र राज्य तलाठी संघटनेचे प्रतिनिधी पोपटवार, महाराष्ट्र राज्य नायब तहसिलदार संघटनेचे अध्यक्ष किरण अंबेकर, महाराष्ट्र राजपत्रित




संघटनेचे प्रतिनिधी डॉ. सचिन खल्लाळ, महाराष्ट्र राज्य अप्पर जिल्हाधिकारी संवर्गाचे प्रतिनिधी दिपाली मोतियेळे यांनीही संबोधित केले. यावेळी अविरत महसूल या राज्यस्तरीय स्मरणिकेचे अनावर करण्यात आले. राज्यातील जवळपास अडीच हजार कर्मचारी या स्पर्धेनिमित्त नांदेडमध्ये आले आहेत. पुढील ३ दिवस ही स्पर्धा नांदेड येथे रंगणार असून क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

# शासकीय नर्सिंग महाविद्यालय बीड येथे योगतज्ञ श्रीमती डॉ. राधा तांबे यांचे योग साधना शिबिर संपन्न

नार्यस्तु राष्ट्रस्य श्व: अर्थात नारी ही उज्वल राष्ट्राचे भविष्य आहे. प्राचीन हडप्पाकालीन संस्कृती पासून ते आजच्या आधुनिक युगापर्यंत नारीने समाजाला आणि देशाला नवी आशा आणि दिशा देण्याची काम केले आहे. प्राचीन हडप्पा संस्कृती स्त्रीप्रधान संस्कृती होती, यावरूनच आपल्याला महिलांचे महत्त्व अर्थसत्ता आणि राजसत्ता मध्ये किती महत्त्वाचा आहे हे दिसून येते. गेले कित्येक दिवस रथसप्तमी निमित्त राज्यभरामध्ये ठिकठिकाणी सूर्यनमस्कार स्पर्धाचे आयोजन होत आहे, त्या ठिकाणी मला योगतज्ञ व योग मार्गदर्शक या नात्याने उपस्थित राहण्यास मिळत आहे. मात्र या सर्वांमध्ये शासकीय नर्सिंग महाविद्यालयामध्ये गेले दहा दिवस चाललेल्या योग साधना शिबिरचा अनुभव खूप अनोखा आहे ,यामध्ये सुमारे २०० मुला-मुलींनी संपूर्ण १० दिवस उपस्थित राहून योग मधे दाखवलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल अत्यंत सकारात्मक अनुभव आला.



समाजाची सेवा करणाऱ्या या भावी परिचार्या असणाऱ्या मुली रुग्णांची सेवा करण्यात स्वतःचे आयुष्य झिजवतात. मात्र स्वतःला पाहिजे तेवढा वेळ आणि लक्ष देता येत नाही, त्यामुळे समाजाची सेवा करत स्वतः देखील कसे सक्षम राहता येईल यासाठी नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ सुवर्ण बेद्रे मॅडम आणि आयुष विभागाचे डॉ.लिंबकर यांनी मुलींसाठी दहा दिवसाचे योग साधना शिबिर आयोजित करण्याचे निर्णय घेतला. त्यामध्ये अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, अगदी पहिल्या दिवसापासून ते समारोप सोहळ्यापर्यंत सर्वांच्या मनामध्ये इतकाच उत्साह दिसून आला जो क्वचित अनुभवास येतो. योग क्षेत्रात मी अनेक शिबिरे आयोजित केली,मात्र या शिबिरामध्ये मुलींनी दाखवलेला प्रतिसाद अद्भुतपूर्वक आणि आनंददायक होता. शास्त्रशुद्ध पद्धतीने योगा सूर्यनमस्कार कसा करता येईल याचे बेसिक पासून डव्हान्स योगासने, प्राणायाम, योग निद्रा याचेमार्गदर्शनवप्रशिक्षणदेण्यातआले. मुलींची योगाची रुची पाहून अजून जास्त शास्त्रशुद्ध पद्धतीने योग शिकवण्यात तितकाच आनंद मनाला होत होता. पुरुषाला घराचा उंबरठा ओलांडताना फक्त कुटुंबाचा विचार करावा लागतो, मात्र स्त्रीला घराचा उंबरठा ओलांडताना वाईट नजरेआड लपलेल्या जगाचा विचार करावा लागतो. या योग सत्रमध्ये शहरातल्या च नाही तर आजूबाजूच्या गावातून मुली पहाटेच्या अंधारात देखील न चुकवता योगशिबिरात उपस्थित राहत होत्या हे आवर्जून स्मरणात राहण्या जोगे आहे.म्हणूनच सुरुवातच

नार्यस्तु राष्ट्रस्य श्व: या संस्कृत श्लोकाने केली. शासकीय नर्सिंग कॉलेजने आयोजित केलेल्या या योग साधना शिबिर उपक्रमाबद्दल प्राचार्य डॉ. सुवर्णा बेद्रे मॅडम उपप्राचार्य मोहिते मॅडम यांचे मनापासून धन्यवाद असे उपक्रम नक्कीच युवकांना पिढीला आणि राष्ट्राला पुढे नेण्यात मदत करतात हे निःसंशय आहे.



अंगणवाडीत शिवजयंती साजरी

बीड : तालुक्यातील चौसाळा येथील अंगणवाडी क्रमांक २ व ४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अंगणवाडी सेविका सुनीता काळे, जाकिरा मुजावर, मदतनीस संगीता निनाळे, हिराबाई गाडेकर, महिला पालक, बालक उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

## जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धेत डॉ. गणेश मुडेगांवकर प्रथम

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद, पुणे यांच्या तर्फे दरवर्षी राज्यस्तरीय नवोक्रम स्पर्धा घेण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२४- २५ साठी घेण्यात आलेल्या नवोपक्रम स्पर्धेमध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक गटामधून येथील रहिवासी डॉ.गणेश अनंतराव मुडेगावकर कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर यांचा नवोपक्रम जिल्हास्तरावर सोलापूर जिल्ह्यात प्रथम आला आहे. इयत्ता बारावी इंग्लिश विषय विद्यार्थ्यांचे वस्तुनिष्ठ प्रश्न निर्मिती कौशल्य आणि लेखन कौशल्य विकसन यासाठी हा नवोपक्रम घेण्यात आला होता. हा उपक्रम जिल्हास्तरावरती प्रथम ठरला आहे. या उपक्रमासाठी सहकारी शिक्षक तेजश्री तळे, कोमल कोंडा, मल्लिकार्जुन पाटील आणि शिवराज देसाई यांचे मोलाचे सहकार्य लाभले. डॉ.मुडेगावकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# अबॅकसच्या माध्यमातून सोमनाथ गिते सरांनी विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताची भीती दूर केली -केंद्रप्रमुख संभाजी सोनवणे

शिवजन्मोत्सव दिनी गिते सरांच्या जी चॅम्प अबॅकसच्या मुलांचा गुणगौरव संपन्न

बीड ।प्रतिनिधी

ज्या प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण करून मराठी माणसाच्या मनात अस्मिता जागृत केली. त्याचप्रमाणे आदर्श शिक्षक सोमनाथ गिते सरांनी अबॅकसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात असणारी गणिताची भीती दूर केली. त्याच बरोबर खऱ्या अर्थाने त्यांनी या सर्व विद्यार्थ्यांचा भावी जीवनाचा पाया भरण्याचे काम केले असल्याचे मत खालापुरी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. संभाजी सोनवणे यांनी गिते सरांच्या अबॅकस क्लासेसमध्ये आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज जयंती आणि अबॅकस परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळा कार्यक्रमाच्या प्रसंगी अध्यक्षीय स्थानावरून बोलताना व्यक्त केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ पत्रकार श्री आत्माराम वाव्हळकर सर, यशवंत विद्यालयाचे आदर्श शिक्षक श्री कृष्णाचंद्र गाडेकर, आरोग्य संघटनेचे अध्यक्ष श्री भारत नागरगोजे साहेब तर पालक प्रतिनिधी म्हणून आदर्श शिक्षक श्री. प्रशांत मिसाळ, विद्यानिकेतन अकॅडेमीचे संचालक श्री. वैजिनाथ धेंडुळे आणि जी चॅम्प अबॅकसचे ब्रेन डेव्हलोपमेंट मास्टर श्री. सोमनाथ गिते सर आदी उपस्थित होते.

बीड शहरातील धानोरा रड परिसरात गेली पाच वर्षांपासून यशस्वीपणे सुरू असलेल्या गिते सरांच्या जी चॅम्प अबॅकस क्लासेसमध्ये बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आणि छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आलेल्या अबॅकस नॅशनल लेव्हलच्या कॉम्पिटिशनमध्ये उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याच्या सुरुवातीला छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर अबॅकस जी चॅम्पियन या परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह, मेडल देऊन सत्कार करण्यात आला. या वर्षीचा जी चॅम्प मराठवाडा विभागाचा बेस्ट अबॅकस टीचर अवार्ड श्री सोमनाथ गिते सरांना



मिळाला. त्या बद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभानंतर चि. शिवतेज गिरे, चि. सत्यमेव सरपते, कु.भक्ती चौरे, कु. श्रुती वाव्हळकर, कु. श्रद्धा कागदे, चि. समर्थ मिसाळ या चिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर भाषण केले. त्यानंतर श्री. गाडेकर सर, श्री. वाव्हळकर सर आणि श्री. धेंडुळे सर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर विचार व्यक्त केले तसेच या वेळी त्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे तोंडभरून कौतुक केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना केंद्रप्रमुख श्री. संभाजी सोनवणे सर यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या विषयी माहिती देताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील घडामोडी गोष्टी रूपाने विद्यार्थ्यां समोर मांडल्या. यावेळी पुढे बोलताना श्री सोनवणे सर म्हणाले की, ज्या प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण करून मराठी माणसाच्या मनात अस्मिता जागृत केली. त्याचप्रमाणे आज आदर्श शिक्षक श्री सोमनाथ गिते सरांनी विद्यार्थ्यांच्या मनात गणिता विषयी असणारी भीती अबॅकसच्या माध्यमातून दूर केली. आज विद्यार्थ्यांना गणिता विषयी प्रचंड आवड निर्माण झाली आहे. त्यामुळे हे सर्व विद्यार्थी सध्या अगदी हसत-खेळत आणि आवडीने गणिताच्या क्रिया करू लागले आहेत. गणिताचे विविध उदाहरणे सोडवू लागले आहेत. श्री सोमनाथ गिते सरांनी घेतलेल्या कष्टामुळे भविष्यात हे विद्यार्थी गणित आणि इतर विषयात निश्चित निपून राहतील यात काही शंका नाही. वास्तविक पाहता खऱ्या अर्थाने श्री. सोमनाथ गिते सरांनी अबॅकसच्या माध्यमातून या सर्व विद्यार्थ्यांच्या जीवनाचा पाया भरण्याचे काम केले आहे. आज समाजातील सुज्ञ नागरिक आणि पालक श्री. सोमनाथ गिते सरांसारख्या गणित प्रिय आणि विद्यार्थी प्रिय आदर्श शिक्षकांना लाईक करत आहेत. विशेषत: आज समाजाला श्री. सोमनाथ गिते सर यांच्यासारख्या शिक्षकांची नितांत गरज निर्माण झाली असल्याचे श्री. संभाजी सोनवणे सर यांनी या सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सोमनाथ गिते यांनी तर आभार श्री मिसाळ सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी पालक आणि माता पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक विजेती कु.नयन बारगजेचा श्री बंकटस्वामी महाविद्यालयात गौरव सोहळा

बीड ।प्रतिनिधी

दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयाची विद्यार्थिनी भारत सरकारच्या इंडियन ऑलिम्पिक असोसिएशन तर्फे आयोजित ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या कु.नयन बारगजे हिने तायक्वांदो खेळात उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदक पटकावले. तिच्या या उल्लेखनीय यशाचा सन्मान म्हणून श्री बंकटस्वामी महाविद्यालयात तिचा भव्य सत्कार करण्यात आला.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे, उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे, डॉ.ब्रम्हनाथ मेंगडे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.शंकर धांडे, डॉ.रामराजे आवारे, कार्यालयीन अधीक्षक श्री शिवाजी भारती, वरिष्ठ लिपिक श्री कल्याण सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.हल्दवानी (उत्तराखंड) येथील आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेत ४९ किलो वजन गटात कु.नयन बारगजे हिने अंतिम फेरीपर्यंत दमदार खेळ करत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत रौप्यपदक जिंकले. सत्कार सोहळ्यात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी नयनच्या यशाचा




आनंद साजरा केला. डॉ.अविनाश भारताचे व श्री प्रवीण सोनकुल यांनी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले. तिच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी महाविद्यालयाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. श्री बंकटस्वामी महाविद्यालयासाठी व बीड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राला हा एक अभिमानाचा क्षण ठरला आहे. या सत्कार समारंभ प्रसंगी बीडमध्ये क्रीडाप्रेमी व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक,कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित.


ग्राम विकास अधिकारी पाटील बेपत्ता, उटावरून शेळ्या हाकु लागले
सतरा सदस्या पैकी फक्त उप सरपंच महिलांच्या समस्या ऐकण्यास उपस्थित

# तलवाडा च्या भ्रष्ट ग्रामपंचायत समोर महिलांचा पाण्यासाठी मोर्चा

तलवाडा ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत गेल्या पाच वर्षापासून कुठल्या कारणाने वादग्रस्त ठरत असून नुसत्या ग्रामस्थांच्या तक्रार दाखल होत असून सरपंच विषय रोष व्यक्त होत असुन शनिवार रोजी सकाळी ग्रामपंचायत समोर गावातील काही महिला अचानक भाडी घेऊन ग्रामपंचायत समोर दाखल झाल्या अचानक महिलांनी ग्रामपंचायत समोर ठिय्या मांडलाने महिला वर्गातून ग्रामपंचायत विषयी संतप्त भावना व्यक्त केल्या जात होत्या सतरा सदस्यांपैकी फक्त उपसरपंच त्या ठिकाणी उपस्थित दिसून आले व महिलांच्या समस्या जाणून घेतल्या साधा सरपंच व इतर सदस्य देखील फिरकले नसल्यामुळे ग्रामस्थातून रोष व्यक्त होताना दिसून येत आहे

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत सरपंच मीनाताई हत्ते हे पदभार पाहत असून सर्व कामे त्यांचे पती विष्णू हात्ते हे पहात असून यामध्ये सत्ताधारी गटाचे बारा सदस्य असे विरोधी बाकावर पाच सदस्य असून एवढ्या पैकी एकाने ही ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेण्याची मनस्थिती दिसून येत नसून पाण्याची टंचाई नसताना देखील ग्रामस्थांना पाण्याचा सामना करावा लागत आहे त्यात समस्या मांडण्यासाठी ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत मध्ये फिरकत सुद्धा नसून अशा अनेकांच्या तक्रारी देखील वरिष्ठाकडे गेलेले असून तलवाडा ग्रामपंचायत राम भरोसे म्हणायची वेळ आली असून शनिवारी रोजी सकाळी नऊच्या दरम्यान वीस ते पंचवीस महिला अचानक भांडे घेऊन ग्रामपंचायत समोर पाण्याचा प्रश्न घेऊन आल्या त्या त्या ठिकाणी थांबून राहिल्यामुळे कोणी तिकडे फिरकले सुद्धा नाही ही माहिती उपसरपंच अक्रम सौदागर यांना माहिती मिळताच त्या ठिकाणी जाऊन सर्व महिलांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर गेंड्याची कातडी पांघरून बसलेला ग्राम विकास अधिकारी पाटील यांच्याशी त्यांनी संपर्क केला असता त्यानी मोबाईल घेण्यास टाळले महिला वर्ग ग्रामपंचायत समोर बसुन असताना गावचा सरपंच सुद्धा आले नसल्या मुळे महिलांनी रोष व्यक्त केला त्यानंतर महिलानी ग्राम विकास अधिकारी पाटील यांच्या खुर्चीला हार घालून आपला रोष व्यक्त केला बातमी लिहीपर्यंत त्या ठिकाणी महिलांच्या समस्या जाणून घेण्यासाठी उपसरपंच सोडता कुणी फिरकले सुद्धा नाही

# उदरनिर्वाहासाठी लहानग्यांच्या जीवघेण्या कवायती ; डोंबारी खेळांकडे नागरिकांचे दुर्लक्ष

लिंबागणेश : शिक्षणाचा गंध नसलेल्या डोंबारी समाजाची कथा आणि व्यथा वेगळीच असल्याने या समाजातील लहानग्यांना दोरी वर वेगवेगळी प्रात्यक्षिके करावयास लाऊन त्यातून मिळणाऱ्या पैशातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो. एकीकडे केंद्र आणि राज्य सरकार शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करत असल्याचे दाखवत असताना वास्तव वेगळेच असुन ५ ते १० वर्षाच्या कोवळ्या जिवांना जीवघेण्या कसरती करायला लाऊन त्यातून मिळणाऱ्या पैशांवर उदरनिर्वाह करत असल्याचे भयान वास्तव ग्रामीण भागात दिसून येते. शिक्षण, विकास आणि आधुनिकतेचा स्पर्श न झालेला हा डोंबारी समाज रस्त्याच्या कडेला तसेच बाजारपेठेत पारंपरिक डोंबारी कला सादर करत नाच व खेळ याच संगम साधत टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी लोकांसमोर कला सादर करून मिळालेल्या उदरनिर्वाह करीत आहेत.

पुर्वी डोंबाऱ्याचा खेळ आला की खेळ पहायला गाव जमा व्हायचे. विविध साहसी खेळ दाखवले जायचे.खेळ झाल्यावर जमलेले बघे लोक १०,२०,५० रूपये द्यायचे परंतु आता खेळ बघणारे डोळे आणि देणारे हातही कमी झाले आहेत. कधी २०० तर कधी नशिबाने ५०० रुपये मिळतात. या खेळातुन पुर्वी चांगली बिदागी मिळत होती व यावर कुटुंबाची उपजीविका चांगली चालत होती.परंतु आजकाल खेळ पाहण्यासाठी लोकांकडे वेळ नाही.गावच्या वेशी जवळ अथवा रोडलगत खेळ सुरू केला तर लोक नजर टाकुन पुढे निघून जातात. त्यामुळे सध्या उपजिविकेचा व्यवसाय अडचणीत आल्याची खंत नागपुरचे रामलाल यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी लिंबागणेश येथे खेळ सादर केल्यानंतर संवाद साधताना बोलावून दाखवली.



## बघणारे डोळे आणि देणारे हातही कमी झाले :- डॉ.गणेश ढवळे

# मराठी भाषा संतांनी टिकवली


## भाषा ही जोडणारी असायला हवी,डॉ.तारा भवाळकरांच्या भाषणाला मोदींसह पवारांची दाद

मराठी फक्त लिखीतच नाही तर ती बोलीतून पसरली आहे. भाषा हे संस्कृतीचं बलस्थान असते. भाषा ही जोडणारी असायला हवी, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांनी व्यक्त केलं.मराठी फक्त लिखीतच नाही तर ती बोलीतून पसरली आहे. भाषा हे संस्कृतीचं बलस्थान असते. भाषा ही जोडणारी गोष्ट असायला हवी, तोडणारी नाही असे मत दिल्लीतील ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांनी व्यक्त केलं. एक स्त्री अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची अध्यक्ष झाली हे महत्वाचं नाही तर गुणवत्ता हा विषय महत्वाचा आहे असंही तारा भवाळकर म्हणाल्या. मराठी भाषा संतांनी टिकवली, आमचे संत पुरोगामी होते, फुरोगामी लोकं काहीही म्हणू देत असेही भवाळकर म्हणाल्या. तारा भवाळकरांच्या भाषणाला पंतप्रधान नरेंद्र मोद आणि शरद पवारांनी दाद दिली.

मराठी भाषा बोलण्यातून विस्तारली

भाषा ही बोलली तर जीवंत राहते, नुसती पुस्तकात आणि ग्रंथात असून उपयोग नाही असेही तारा भवाळकर म्हणाल्या. महाराष्ट्राला पाडुंरंगाचे स्मरण करायला लावणारी ही मराठी भाषा आमच्या संतांनी जीवंत ठेवल्याचे त्या म्हणाल्या. मराठी भषा बोलण्यातून विस्तारली आहे, त्यामुळं छत्रपती शिवाजी महाराजांना खेड्यापाड्यातील मावळे मिळाले असेही तारा भवाळकर म्हणाल्या.

भाषा ही बोलली तर जीवंत राहते, नुसती पुस्तकात आणि ग्रंथात असून उपयोग नाही असेही तारा भवाळकर म्हणाल्या. महाराष्ट्राला पाडुंरंगाचे स्मरण करायला लावणारी ही मराठी भाषा



आमच्या संतांनी जीवंत ठेवल्याचे त्या म्हणाल्या. मराठी भषा बोलण्यातून विस्तारली आहे, त्यामुळं छत्रपती शिवाजी महाराजांना खेड्यापाड्यातील मावळे मिळाले असेही तारा भवाळकर म्हणाल्या. विठ्ठल रखुमाई हे आमच्या महाराष्ट्राचं आराध्य दैवत आहे. हे आमच्या उदार संस्कृतीचं दर्शन असल्याचे भवाळकर म्हणाल्या. कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी लसूण मिरची कोथिंबीर अवघा झाला माझा हरी असे सांगणारे संत सावता माळी यांनी मराठी भाषा टिकवली, माझा मराठीची बोलू कौतुके, परि अमृतातेहि पैजासी जिंक, ऐसी अक्षरे रसिके मेळवीन असे ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितले, या संतांनी मराठी भाषा जीवंत केल्याचे भवाळकर म्हणाले. आज दिल्लीत ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते झाले.

# सावधान! ‘या’ बँकांमध्ये तुमचे खाते आहे का?

## सहकारी बँकांमध्ये घोंगावतेय घोटाळ्यांचे वादळ!

मुंबई ।प्रतिनिधी

सहकारी बँकांकडून आर्थिक नियमांचे उल्लंघन करण्याचा प्रश्न फक्त न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक पुरता मर्यादित नाही. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ला अनेक वेळा हस्तक्षेप करून घोटाळाग्रस्त वित्तीय संस्थांवर नियंत्रण ठेवावे लागले आहे, कारण या बँकांनी गंभीर नियामक नियमांचे उल्लंघन केले आहे. यामध्ये न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेसह पंजाब आणि महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँक, रुपी को-ऑपरेटिव्ह बँक, भारत को-ऑपरेटिव्ह बँक, कॉस्मॉस को-ऑपरेटिव्ह बँक, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक , महाराष्ट्र राज्य सहकारी बँक या बँकांचा देखिल समावेश आहे.

सहकारी बँका ग्रामीण आणि निमशहरी भागातील आर्थिक समावेशनासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. मात्र, अनेक बँकांनी सातत्याने आवश्यक नियामक नियमांचे उल्लंघन केले, त्यामुळे आर्थिक अस्थिरता आणि सार्वजनिक




विश्वास गमावण्याचे संकट निर्माण झाले आहे.या समस्यांवर मात करण्यासाठी शासनव्यवस्था, पारदर्शकता, नियामक नियंत्रण आणि अंतर्गत व्यवस्थापन सुधारण्याची तातडीची गरज आहे. या उपाययोजनांमुळे सहकारी बँकांचे भविष्य सुरक्षित राहील आणि सार्वजनिक विश्वास पुनर्स्थापित होईल.भारतातील सहकारी बँका केंद्र आणि राज्य सरकारच्या मिश्र कायद्यांअंतर्गत कार्यरत असतात. त्यांचे प्रमुख नियमन सहकारी संस्था कायदा, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया , राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक आणि ठेव विमा आणि पत हमी महामंडळ यांसारख्या संस्थांकडून केले जाते. या संस्थांचे काम सहकारी बँकांचे आर्थिक स्थैर्य, योग्य प्रशासन आणि ठेवीदारांचे संरक्षण सुनिश्चित करणे आहे.कठोर आर्थिक तपासणीच्या अभावामुळे अनियमितता आणि आर्थिक फसवणुकीचे अनेक प्रकार उघडकीस येत नाहीत. सहकारी बँका बँकिंग रेग्युलेशन अ‍ॅक्ट, सहकारी संस्था कायदा आणि राज्यस्तरीय कायद्यांच्या संमिश्र अधिनियमानुसार कार्य करतात, त्यामुळे त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे असंगत आणि कमकुवत होते.सहकारी बँकांमधील घोटाळ्यांचे प्रमुख कारण कमकुवत नियामक नियंत्रण, पारदर्शकतेचा अभाव, राजकीय हस्तक्षेप आणि अंतर्गत व्यवस्थापनातील त्रुटी आहेत.सहकारी बँकांचे भवितव्य वाचवण्यासाठी कठोर नियामक यंत्रणा उभारणे, बँकिंग प्रणालीत पारदर्शकता आणणे, राजकीय हस्तक्षेप कमी करणे आणि अंतर्गत आर्थिक नियंत्रण मजबूत करणे आवश्यक आहे. सहकारी बँकांमधील घोटाळे रोखण्यासाठी सखोल सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, या बँकांवरील सामान्य नागरिकांचा विश्वास उडेल, ज्याचा परिणाम संपूर्ण आर्थिक प्रणालीवर होऊ शकतो.सहकारी बँकांमधील वाढते घोटाळे पाहता, कठोर नियामक उपाययोजना आणि पारदर्शकतेची आवश्यकता असल्याचे स्पष्ट होते.

# कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा

## परीक्षेच्या पहिल्याच दिवशी पेपर फुटला! ’२० रुपयात मिळतेय दहावीची प्रश्नपत्रिका’

दहावीचा पेपर फुटला

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या माध्यमांतून राज्यभरात आज पासून दहावीची परीक्षा सुरु झाली आहे. ही परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्चपर्यंत सुरु राहणार आहे.यंदा परीक्षेला १६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थी बसले आहेत. तर यामध्ये ८ लाख ६४ हजार १२० मुले, ७ लाख ४७ हजार ४७१ मुली, तर १६ ट्रान्सजेंडर परीक्षा देणार आहेत. परीक्षेसाठी एकूण २९ हजार ४९२ माध्यमिक शाळांमधून विद्यार्थ्यांची नोंदणी केली आहे. तर ५ हजार १३० मुख्य केंद्रांवर परीक्षा होत आहे. दरम्यान परिक्षेच्या पहिल्याच दिवशी पेपर फुटल्याचा खळबळजनक प्रकार समोर आलाय. दहावीचा मराठी विषयाचा पेपर फुटला आहे. जालनातील बदनापूर शहरात हा प्रकार समोर आला. येथे चक्क २० रुपयात दहावीच्या प्रश्नपत्रिका मिळत आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांचा आज पहिला मराठी विषयाचा पेपर होता. राज्यभरातील विविध केंद्रांमध्ये परीक्षा सुरु झाली. पण बदनापूर येथील परीक्षा केंद्रावर वेगळाच प्रकार सुरु होता. पेपर फुटल्यानंतर अवघ्या १५ मिनिटांतच प्रश्नपत्रिता बाहेर आली. यानंतर शहरातील झेरॉक्स सेंटरवर प्रश्नपत्रिकेच्या कॉपी मिळू लागल्या. अवघ्या २० रुपयांना या कॉपी विकल्या जात होत्या. त्यामुळे बोर्डाकडून ही प्रश्नपत्रिका रद्द करुन पुन्हा परीक्षा घेणार का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.जालन्यासोबतच येवल्यातही कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा उडाल्याचं चित्र आहे. दहावीच्या परीक्षेच्या पहिल्याच दिवशी येवल्यातील काही परीक्षा केंद्रांवर कॉपी पुरवण्यासाठी गर्दी झाल्याचं चित्र पाहायला मिळालंय.. अनेक केंद्रांवर बाहेरून कॉपी पुरवण्यासाठी टवाळखोरांनी गर्दी केली होती.कॉपी पुरवण्यासाठी विरोध करणा-या शिक्षकांना देखील टवाळखोर दमदाटी करत असल्याचे काही शिक्षकांनी सांगितलं. दरम्यान यावेळी झी २४ तासचा कॅमेरा बघताच टवळखोरांची एकच पळापळ झाली.




### काय म्हणाले जिल्हाधिकारी?


दहावीचा मराठीचा पेपर फुटला नाही. स्थानिक झेरॉक्स दूकानदारांनी आजच्या मराठी विषयाच्या प्रश्न पत्रिकेत न आलेल्या प्रश्नांची झेरॉक्स काढून विक्री केली अशी माहिती जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली. जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयाकडून यासंदर्भात माहिती देण्यात आली आहे. दरम्यान दोषी व्यक्तींवर कारवाई करणार असल्याचे यात सांगण्यात आले. आज काही वृत्त वाहिन्यानी ‘जालना जिल्ह्यातील बदनापूर शहरात दहावीचा मराठी विषयाचा पेपर फुटला’ या आशयाचे चूकीचे वृत्त प्रसारित करण्यात आले आहे. परंतू प्रत्यक्षात असा कोणताही प्रकार घडलेला नसुन, स्थानिक झेरॉक्स दूकानदारांनी आजच्या मराठी विषयाच्या प्रश्न पत्रिकेत न आलेल्या प्रश्नांची झेरॉक्स काढून विक्री केली आहे. प्रश्न पत्रिका परिक्षा केंद्राच्या बाहेर आलेली नाही. तथापी याठिकाणी दगडफेक झाली. याबाबत दोषीं व्यक्तीचा शोध घेवून गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी कळविले आहे.

# मराठी भाषा ही अमृताहूनी गोड आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी

कोट्यवधी मराठी भाषिकांची ‘ती’ इच्छा मी पूर्ण केली, पंतप्रधान मोदी नेमकं कशाबद्दल म्हणाले?

नवी दिल्लीतील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी मराठी भाषेतील भक्ती, शक्ती आणि युक्तीचे कौतुक केले आणि तिच्या सांस्कृतिक योगदानावर प्रकाश टाकला. संमेलनात शरद पवार आणि देवेंद्र फडणवीस हे देखील उपस्थित होते.

राजधानी नवी दिल्लीत आज अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या संमेलनाचं उद्घाटन करण्यात आलं. या कार्यक्रमाला संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून शरद पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील उपस्थित होते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला याबद्दल भाष्य केले.यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शरद पवार हे शेजारी बसल्याचं पाहायला मिळालं. याच कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान मोदींनी शरद पवारांना खुर्चीवर बसण्यासाठी मदत केल्याचं पाहायला मिळालं. एवढंच नव्हे तर आदराने पाण्याचा ग्लास देखील भरून दिला. या संदर्भातील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकंतच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात जोरदार भाषण केले. मराठीत भक्ती आहे, शक्ती आहे आणि युक्तीही आहे. संघामुळेच मला मराठी भाषा अवगत झाली, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

भाषा केवळ संवादाचं माध्यम नाही

संघामुळेच मला मराठी भाषा अवगत झाली. काही दिवसापूर्वी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. देश आणि जगात १२ कोटीहून अधिक मराठी भाषिक लोक आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा ही कोट्यवधी मराठी भाषिकांची इच्छा होती. दशकांपासून हे काम अपूर्ण होतं. मला ते पूर्ण करण्याची संधी मिळाली. हे माझं भाग्य आहे. भाषा केवळ संवादाचं माध्यम नाही. भाषा ही संस्कृतीची वाहक आहे. भाषा समाजात जन्म घेत असते. पण भाषा समाजाच्या निर्माणात तेवढीच महत्त्वाची भूमिका निभावते.

# माणिकराव कोकाटे यांची राज्यपालांनी हकालपट्टी करावी व आमदारकी रद्द करावी-हर्षवर्धन सपकाळ

मुंबई ।प्रतिनिधी
रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी घेऊन लाल बहादूर शास्त्री यांनी राजीनामा देऊन आदर्श घालून दिला आहे. पण आत्ताच्या सत्ताधारी भाजपाने नैतिकतेला हरताळ फासला आहे. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना फसवणूक प्रकरणी न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा ठोठावल्यानंतर त्यांनी तात्काळ राजीनामा द्यायला हवा होता किंवा सरकारने त्यांचा राजीनामा घ्यायला हवा होता पण तसे झाले नाही. आता महामहिम राज्यपाल यांनीच याप्रकरणात लक्ष घालून माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घ्यावा व त्यांची आमदारकी रद्द करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

महाराष्ट्र एसटी कामगार काँग्रेसने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भेट दिली, त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले की, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर मानहानीच्या एका बोगस प्रकरणात न्यायालयाने शिक्षा ठोठवली असता सचिवालयाने अर्ध्यारात्रीच त्यांची खासदारकी रद्द केली, त्यानंतर त्यांचे शासकीय घरही सोडण्यास भाग पाडले तसेच काँग्रेसचे नेते व माजी मंत्री सुनिल केदार यांना न्यायालयाने शिक्षा ठोठावताच त्यांची आमदारकी तात्काळ रद्द करण्यात आली पण माणिकराव कोकाटे यांच्याबाबतीत वेगळा न्याय आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांसाठी वेगळा न्याय कसा, असा प्रश्न विचारून कोकाटे प्रकरणात सरकार लोकशाही पद्धतीने वागत नाही असे सपकाळ म्हणाले.

महाराष्ट्र एसटी काँग्रेसच्या रक्तदान शिबीरात बोलताना सपकाळ म्हणाले की, एसटी ही महाराष्ट्राची जीवनवाहिनी आहे, ग्रामीण भागात एसटी सेवेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे, ही सेवा चालू राहिली पाहिजे. एसटीमध्ये ज्या सवलती दिल्या जातात त्याचा पैसा राज्य सरकारने एसटी महामंडळाला दिला पाहिजे. एसटी कामगारांच्या वतीने रक्तादानासारखे महत्वाचे कार्य वर्षानुवर्षे सुरु आहे हे कौतुकास्पद आहे असेही सपकाळ म्हणाले. महाराष्ट्र एसटी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते या कार्यक्रमाला राज्यभरातून आलेले एस टी काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.



### शिवरायांचे मावळे आणि संघ स्वयंसेवकांची तुलनाच होऊ शकत नाही..

गोविंदगिरी महाराजांच्या विधानावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे आणि संघ स्वयंसेवक यांची तुलनाच होऊ शकत नाही. हा महाराजांचा आणि मावळ्यांचा अपमान करण्याचा प्रयत्न आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकेला विरोध करणारा विचार हा संघाच्या विचाराशी मुळता जुळता आहे. शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या शौर्याबद्दल अफवा पसरवण्याचे काम ते सातत्याने करत आहेत. मावळ्यांचा विषय जातीच्या पलीकडचा आहे, ते कोणत्या जाती धर्माचे नव्हते तर स्वराज्याच्यासाठी लढणारे छत्रपतींचे सैन्य होते. हेच गोविंदगिरी देवेंद्र फडणवीस यांना छत्रपती शिवाजी महाराजांना जिरेटोप घालून त्यांना महाराज बनवण्याचा प्रयत्न करत होते. जिरेटोप हे शिवाजी महाराजांचे प्रतिक आहे ते सुद्धा आरएसएस बळकावू पहात आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## बहुजनांच्या सोबतीने शिवरायांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली.डॉ.योगेश क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी
तीनशे वर्षापूर्वी छत्रपती शिवरायांनी कोणत्याही जाती धर्माचा द्वेष न करता, सर्वांना समान सामाजिक न्यायाच्या हेतूने,वंचित, अपेक्षित समूहांना सोबत घेऊन स्वराज्याची मुहूर्तमेढ उभारली.असे प्रतिपादन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवा निमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

पुढे बोलताना डॉ.क्षीरसागर म्हणाले की,अठरा पगड जातींच्या मावळ्यांना सोबत घेत छत्रपती शिवरायांनी या स्वराज्याचे तोरण बांधून रयतेच्या मनात सुशासनाचा आदर्श निर्माण केला.यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लेझीम संचलन करून छत्रपती शिवरायांची भव्य मिरवणूक काढली,पोवाडा,नाट्य,पाळणा, यांसह विविध दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी संसदेच्या वतीने करण्यात आले होते.

यावेळी विचार मंचावर महाविद्यालयाचे सल्लागार डॉ.अरुण भस्मे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र



गौशाल,उपप्रचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर,उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर यांनी केले. सूत्रसंचालन समन्वयक डॉ.पूनम शिंदे यांनी केले. तर आभार प्रदर्शन रमेश थोरात यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ.शेख अतीक, डॉ.शेख जफर,डॉ मीना हंगे,डॉ.सुनील जायभाये डॉ.अजय कुलकर्णी, डॉ.राजेश कुलकर्णी डॉ.वैभव शाहापुरे,डॉ.नवाज शेख,एकनाथ टेपाळे,नायब खान,अमन खान,रमेश थोरात,यांचे सह कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अबॅकसच्या माध्यमातून सोमनाथ गिते सरांनी विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताची भीती दूर केली - केंद्रप्रमुख संभाजी सोनवणे

बीड ।प्रतिनिधी
ज्या प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण करून मराठी माणसाच्या मनात अस्मिता जागृत केली. त्याचप्रमाणे आदर्श शिक्षक सोमनाथ गिते सरांनी अबॅकसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात असणारी गणिताची भीती दूर केली. त्याच बरोबर खऱ्या अर्थाने त्यांनी या सर्व विद्यार्थ्यांचा भावी जीवनाचा पाया भरण्याचे काम केले असल्याचे मत खालापुरी केंद्राचे केंद्रप्रमुख संभाजी सोनवणे यांनी गिते सरांच्या अबॅकस क्लासेसमध्ये आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज जयंती आणि अबॅकस परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळा कार्यक्रमाच्या प्रसंगी अध्यक्षीय स्थानावरून बोलताना व्यक्त केले.

### शिवजन्मोत्सव दिनी गिते सरांच्या जी चॅम्प अबॅकसच्या मुलांचा गुणगौरव संपन्न




यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार आत्माराम वाव्हळकर सर, यशवंत विद्यालयाचे शिक्षक कृष्णाचंद्र गाडेकर, आरोग्य संघटनेचे अध्यक्ष भारत नागरगोजे तर पालक प्रतिनिधी म्हणून शिक्षक प्रशांत मिसाळ, विद्यानिकेतन अकॅडेमीचे संचालक वैजिनाथ धेंडुळे आणि जी चॅम्प अबॅकसचे ब्रेन डेव्हलोपमेंट मास्टर सोमनाथ गिते सर आदी उपस्थित होते.

बीड शहरातील धानोरा रड परिसरात गेली पाच वर्षांपासून यशस्वीपणे सुरू असलेल्या गिते सरांच्या जी चॅम्प अबॅकस क्लासेसमध्ये बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आणि छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आलेल्या अबॅकस नॅशनल लेव्हलच्या कॉम्पिटिशनमध्ये उज्वल यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याच्या सुरुवातीला छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर अबॅकस जी चॅम्पियन या परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह, मेडल देऊन सत्कार करण्यात आला. या वर्षीचा जी चॅम्प मराठवाडा विभागाचा बेस्ट अबॅकस टीचर अवार्ड श्री सोमनाथ गिते सरांना मिळाला. त्या बद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभानंतर चि. शिवतेज गिरे, चि. सत्यमेव सरपते, कु.भक्ती चौरे, कु. श्रुती वाव्हळकर, कु. श्रद्धा कागदे, चि. समर्थ मिसाळ या चिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर भाषण केले. त्यानंतर श्री. गाडेकर सर, श्री. वाव्हळकर सर आणि श्री. धेंडुळे सर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर विचार व्यक्त केले तसेच या वेळी त्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे तोंडभरून कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सोमनाथ गिते यांनी तर आभार श्री मिसाळ सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी पालक आणि माता पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी घेतला मृद व जलसंधारणाच्या कामांचा आढावा

यवतमाळ ।प्रतिनिधी
जिल्ह्यात सुरु असलेल्या मृद व जलसंधारणाच्या विविध कामांचा पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी आढावा घेतला. येत्या तीन महिन्यात जास्तीत जास्त कामे पुर्ण करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

बैठकीला जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, जलसंधारण विभागाचे अधिक्षक अभियंता श्री.निपाने, प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वैशाली रसाळ, जिल्हा जलसंधारण अधिकारी भुपेश दमाहे, जिल्हा परिषद सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता ए.आर.पांडे यांच्यासह जलसंधारण विभागाचे उपविभागीय अभियंता, कनिष्ठ अभियंता आदी उपस्थित होते.

## रोहिलागड केंद्रांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज जयंती विविध उपक्रमाने साजरी

रोहिलागड ।प्रतिनिधी
तालुक्यातील रोहिलागड येथे निपुण केंद्र रोहिलागड अंतर्गत परिसरातील देशगव्हाण, चिकणगांव, किनगाव, निहालसिंगवाडी, कौचलवाडी, माहेर भायगांव, श्रीकृष्ण नगर या जि.प. प्रशासनाच्या व जिजामाता महाविद्यालय किनगाव जामुवंत महाविद्यालय रोहिलागड व राजुरेश्वर वि. चिकणगांव या शाळा कॉलेज मध्ये केंद्राचे केंद्र प्रमुख राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त श्रीमंत गंगावणे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने भाषण स्पर्धा, चित्रकला, वादविवाद स्पर्धा,




रांगोळी स्पर्धा, वेशभूषा, चित्र प्रदर्शन स्पर्धा व अभिवादन अशा विविध उपक्रमाने उत्स्फूर्त प्रतिसादाने साजरी करण्यात आली.

यावेळी गांवातील आजी माजी सरपंच समिती अध्यक्ष शिक्षणप्रेमी पालक सदस्य शिक्षक सह मुख्याध्यापक कोकडे शेळके चरावंडे अधघड बागुल गिते जामदार पठाडे चांगले यांची उपस्थिती होती.कार्यक्रम सुत्रसंचालन नामदेव गंगावणे तर आभार नाथा टकले यांनी केले.

# धम्मभूमी मौजे शिवणी येथे माता रमाई जयंती संपन्न

बीड ।प्रतिनिधी
प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था बीडच्या वतीने धम्मभूमी मौजे शिवणी येथे त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती उत्साहात संपन्न करण्यात आली. याप्रसंगी पूज्य भिक्ख महाविरो थेरो काळेगाव अहमदपूर यांच्या हस्ते तथागताच्या प्रतिमेस तर प्रमुख अतिथी प्रा.डॉ. भारती फुलेकर यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाई यांच्या यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. सामुदायिक त्रिशरण पंचशील ग्रहण केल्यानंतर पूज्य भिक्खु महाविरो थेरो यांनी आपल्या धम्मदेशेत माघ पौर्णिमेच्या दिवशी तथागताच्या जीवनात घडलेल्या घटनेबद्दल सविस्तर माहिती दिली. सध्याच्या इंटरनेट,मोबाईलच्या जमान्यात माणूस माणसापासून दूर जात आहे. परंतु माणसाने माणसाशी कसे वागावे हे तथागताने विपश्यनेच्या मार्गातून माणूस त्रिशरण, पंचशील, व दहा पारमितेच्या पालनास तयार होतो. मैत्री, प्रेम, करुणा, यासारख्या दहा पारमिता पाळून कुशल कर्म करण्यास तत्पर होतो हे अनेक उदाहरणाद्वारे सांगितले. प्रमुख अतिथी प्रा.डॉ.भारती फुलेकर यांनी त्यागमूर्ती माता रमाईच्या जीवनातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणाकरिता केलेला त्याग व समाज हितासाठी, देशासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर करीत असलेल्या प्रयत्नांना सावलीसारखी सोबत दिली. अशा प्रकारच्या माता रमाईच्या जीवनातील अनेक दुःखद प्रसंग सांगून सर्वांच्या डोळ्यासमोर त्यांचा जीवनपट उभा केला. तेव्हा सर्व उपस्थित गहिवरून गेले. याप्रसंगी लहान, बालक, बालिकांनी माता रमाईच्या जीवनावर गीत व नाट्यप्रसंग करून दाखवले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक अलकाताई डोंगरे यांनी केले तर सूत्रसंचालन वंदनाताई वाघमारे यांनी



केले. सर्वांचे आभार ज्योतीताई सरवदे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास परिसरातील महिला पुरुष व बालकांची व संस्थेच्या बहुतांश सदस्यांची उपस्थिती होती. सरणातय व भोजनदान खीर दानाने कार्यक्रमाची सांगता झाली.



## वडवणी बाजार समितीच्या वतीने पत्रकार संघाच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी अँड विनायक जाधव यांची निवड झाल्याबद्दल सत्कार

वडवणी ।प्रतिनिधी
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई बीड जिल्हा अध्यक्षपदी अँड विनायक जाधव यांची व डिजिटल मिडिया वडवणी तालुका अध्यक्ष पदी सतिष राव मुजमुले यांची निवड झाल्याबद्दल बाजार समितीच्या वतीने सभापती संभाजी शिंदे व संचालक यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी माजी प.स. उपसभापती संदिपान आप्पा खळगे, संचालक रणजित आप्पा मस्के, संचालक सचिनराव लंगडे, संचालक नारायण भाऊ शेळके, संचालक बबनराव मांजरे, बाजार समिती सचिव गोविंदराव आंधळे, पत्रकार एजाज शेख यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला यावेळी कर्मचारी उपस्थित होते.

# रिचार्ज वाल्या ताईंच्या खात्यावर २५ खोक्यांचा टाकलाय बॅलन्स

### लवकरच देणार पुरावे, सूरज चव्हाणांचे ट्विट अन् अंजली दमानिया यांचा आकांड तांडव

मुंबई ।प्रतिनिधी
राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करण्यासाठी रिचार्ज वाल्या ताईच्या खात्यावर २५ खोक्यांचा बॅलन्स टाकण्यात आला आहे. काही काम न करता वर्षाला १५ देश फिरणाऱ्या व अडीच कोटी टॅक्स भरणाऱ्या स्वयंघोषित समाजसेविका ताई, तुमचा रिचार्ज कुणाच्या माध्यमातून झाला आहे ते लवकरच पुराव्यासहित उघड करणार, असे ट्विट केल्यानंतर हे ट्विट स्वतःवर ओढून घेत तथाकथित समाजसेविका अंजली दमानिया यांनी प्रचंड त्रागा करत सोशल मीडियावर संताप व्यक्त करून आकांड तांडव केल्याचे दिसत आहे.

सुरज चव्हाण यांच्या या ट्विट नंतर अंजली दमाने यांनी मला प्रचंड राग आला असल्याचे म्हटले असून, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी माजी सर्व बँक खाते तपासावी व त्यावर कुठलीही बेहिशोबी दमडी तरी आहे का हे तपासावे. मी लढते म्हणून माझा छळ करणार आहात का ? असा सवाल उपस्थित केला आहे.

मात्र यावेळी नेटकऱ्यांनी मात्र अंजली दमानिया यांना चांगलेच धारेवर धरल्याचे दिसत आहे. काहीही व्यवसाय न करणाऱ्या अंजली दमानिया वर्षाला अडीच कोटी टॅक्स कसा काय भरू शकतात ? असा प्रश्न काहींनी उपस्थित केलाय. तर विविध नेते मंडळींवर बिनबुडाचे व निराधार आरोप करणाऱ्या अंजली दमान्यांवर एक आरोप झाला तर इतकी मिरची लागण्याचे काय कारण असाही सवाल अनेकांनी उपस्थित केला आहे.

काही जणांनी आपण अंजली दमानिया यांच्या पाठीशी असल्याचे बोलले आहे तर, सुरज चव्हाण यांनी आपल्या ट्विटमध्ये कोणाचेही नाव घेतले नव्हते मात्र तरी ते ट्विट अंजली दमानिया यांना बरोबर का लागले. याचाच अर्थ रिचार्ज वाल्या ताई कोण ते महाराष्ट्राला कळले असेही मत अनेकांनी व्यक्त केले आहे.दरम्यान अंजली दमानिया ह्या केवळ प्रसिद्धीसाठी आरोप करून एखाद्या प्रकरणांमध्ये एन्ट्री घेतात, त्यानंतर त्यांचे हेतू साध्य झाले की त्या प्रकरणातून गुपचूप एक्झिट घेतात आणि नंतर असेच दुसरे मोठे हाय प्रोफाईल प्रकरण शोधण्यामध्ये व्यस्त होतात, असा आरोप त्यांच्यावर याआधीही धनंजय मुंडे यांच्यासह अनेक मोठ्या नेत्यांनी केलेला आहे.

दुसरीकडे अंजली दमानिया यांनी मागील दोन महिन्यांमध्ये अर्धवट माहितीच्या आधारे निराधार व खोटे आरोप केल्याचे याआधी उघड झालेले आहे. तर दुसरीकडे अंजली दमानिया यांच्या संदर्भात सुरज चव्हाण यांनी २५ कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचा केलेला आरोप व त्यावरून ते पुराव्यांसह खुलासा करणार असल्याचे सूरज यांनी बोलले

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT